Exh.01

# नेवासा येथील मे.ज्युडिशियल मॅजि.साहेब वर्ग १

यांचे कोर्टात. .

~~क्रि.चौ.अर्ज नं.~~ अर्ज

**अर्जदार**

pwdva 22-2023 /२०२३

१.दामिनी प्रसाद गायकवाड वय २२,धंदा काहीनाही

२.सानवी प्रसाद गायकवाड वय ८ महिने

दोघे रा.ह.मु.द्वारा शशिकांत छोटू चक्रनारायण

रा.नेवासा ता.नेवासा जि.अ.नगर

मो नं.८३०८२१४६५४

Order

-------------------

Keep for DID Order

SANDHYA YUVRAJ SUL Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL Date: 2025.10.31 17:19:28 +0530

2nd JMFC

**सामनेवाले**

१. प्रसाद अरुण गायकवाड वय २८,धंदा हॉटेल व्यवसाय

२. छाया अरुण गायकवाड वय ५५,धंदा घरकाम

३. आरती अरुण गायकवाड वय ३८,धंदा घरकाम

सर्व रा.खंडाळा ता.श्रीरामपुर जि.अहमदनगर

**याकामी अर्जदाराचा अर्ज महिलांचा कौटूंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २०,२१,२२,२३ व ३१ नुसार अर्ज असे तो खालीलप्रमाणे :-**

१. याकामी अर्जदाराचा अर्ज असा आहे की : अर्जदार नं.१ ही सामनेवाला नं.१ यांची पत्नी असून अर्जदार नं.२ ही अर्जदार नं.१ व सामनेवाला नं.१ यांची मुलगी आहे.तसेच सामनेवाला नं.२ ही अर्जदार नं.१ सासु असून सामनेवाला नं.३ ही अर्जदार नं.१ नंनद आहे.

२. अर्जदार नं.१ चा विवाह सामनेवाला नं.१ याचे बरोबर दि.१६/४/२०२१ रोजी मौजे डाक बंगला (रेस्ट हाऊस) नेवासा ता.नेवासा जि.अ.नगर येथे मोठे थाटा माटात खिश्चन धर्म शास्त्र जातीरिवाजा प्रमाणे झालेला आहे. सदरचे लग्ना मध्ये अर्जदाराचे आई वडिलांनी खुप मोठा खर्च करुन सदरचे लग्न थाटामाटात करुन दिलेले होते व आहे.. लग्ना मध्ये अर्जदार हिच्या आई वडिलांनी अर्जदार हिस सर्व संसार उपयोगी भांडी कुंडी,साहित्य,फर्निचर,इलेक्ट्रीक वस्तु असे देवून २ तोळे सोन्याची अंगठी, ३ तोळयाचे लॉकीट सामनेवाला यांना दिले. तसेच अर्जदार नं.१ हिच्या अंगावर सुमारे ३ तोळयाचे दागिणे घातले व लग्न लावून दिले. लग्नानंतर अर्जदार नं.१ ही सामनेवाला यांच्याकडे मौजे खंडाळा ता.श्रीरामपुर येथे नांदवयास गेली. सामनेवाला नं.१ यांचे घरी सामनेवाला नं.२ व ३ तसेच सामनेवाला नं.१ यांचा भाऊ व सामनेवाला नं.१ यांचे भावाची बायको असे एकत्र राहत होते. तसेच लग्नसंबंधातुन अर्जदार नं.१ हिस सामनेवाला नं.१ पासुन दिवस जाऊन अर्जदार नं.२ ही मुलगी झालेली आहे.

३. सुरुवातीचे काही दिवस सामनेवाला यांनी अर्जदार हिस बऱ्यापैकी नांदविले व त्यानंतर सामनेवाला व त्याचे कुटूंबियाचे लोक हे अर्जदार नं.१ हिस मुलगी झाली म्हणून त्रास देवु लागले व तिला मारहाण करु लागले व तिला रक्कम रुपये ७ लाख रुपये हॉटेल व्यवसाय वाढविण्यासाठी मागणी करु लागले व तिचा मानसीक व शारीरीक त्रास देवु लागले.

४. मुलगी झाली म्हणून सामनेवाला नं.१ ते ३ हे अर्जदार नं.१ हिस त्रास देवुन लागले त्यावेळी अर्जदार नं.१ हिने सामनेवाला यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता परंतु सामनेवाला यांच्यां मध्ये काहीएक बदल झाला नाही. सामनेवाला हे पैशाचे कारणावरुन व मुलगी झाली म्हणून अर्जदार हिस सुमोर ८ महिण्या पासुन त्रास होत होते व आहे.

५. दरम्यानचे काळात सामनेवाला नं.१ हा अर्जदार हिस जास्तच त्रास देवु लागला व तिला पैशाची मागणी करुन सुमारे २ महिण्यापुर्वी एकावस्त्रा निशी घरा बाहेर अर्जदार नं.१ व २ हाकलुन दिले.

६. त्यानंतर नाविलजास्तव अर्जदार हिने तिच्या आई व वडिलांना घेवुन जाऊन सामनेवाला यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता परंतु सामनेवाला यांनी सांगितले की, मला हॉटेल व्यवसाय वाढ करावयाची आहे., त्यासाठी मला ७ लाखाची आवश्यकता आहे, तुम्ही मला पैसे दया नाही, नाहीतर तुमच्या मुलीला घेवुन जा, तिला मुलगी झालेली आहे. असे म्हटले त्यावेळी अर्जदार यांची आई व वडिल व नातेवाईकांनी सांगितले की, आमची एवढी मोठी रक्कम देण्याची ऐपत नाही, सदरच्या गोष्टीचा सामनेवाला नं.१ यास राग आला व त्याने अर्जदार व तिच्या आई वडिलांना व नातेवाईकांना घरातुन हाकलुन दिले.

७. त्यानंतर अर्जदार व तिचे आई वडिल व नातेवाईकांनी सामनेवाला नं.१ कडे अर्जदार हिस नांदण्यास नेण्यासाठी खुप प्रयत्न केले परंतु सामनेवाला नं.१ यांच्या वागण्यात काहीएक फरक पडला नाही व त्याने अर्जदार हिस नांदविण्यास स्पष्ट नकार दिलेला आहे.

८. असे असतांना दि.२२/०३/२०२३ रोजी सामनेवाला हे अर्जदार हिचे आई वडिलांचे घरी आले व अर्जदार व तिचे आई वडिलांना सांगितले की, आमच्या पैशाचे काय झाले, तुम्ही लवकर पैसे दया नाहीतर आम्ही तुमच्या मुलीला नांदविणार नाही, कारण तुम्ही लग्ना मध्ये आम्हाला कमी हुंडा दिला होता त्यावेळी अर्जदार व तिचे आई वडिलांनी त्यास नकार दिला असता सामनेवाला व त्याचे आई व बहिण यांनी अर्जदार हिस पैशाचे कारणावरुन व मुलीच्या कारणावरुन मारहाण केली व निघुन गेले.

५

९. अर्जदार नं.१ हिस सामनेवाला यांनी दिलेल्या त्रासामुळे व छळामुळे नेहमी आजारी असते तिला कोणताही कामधंदा होत नाही.सामनेवाला नं.१ याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी अर्जदारांना सांभाळण्याची अर्जदारांची अन्नवस्त्र पोटगीची जबाबदारी असतांना ही सामनेवाला नं.१ हा जाणीव पूर्वक नाकारीत आहे.अर्जदाराचे आई वडिलांची परिस्थिती अत्यंत हालाखाची आहे.अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने अर्जदारावर उपासमारीची वेळ आलेली आहे.

१०. या उलट सामनेवाला नं.१ हा खडाळा ता.श्रीरामपुर गावातील मोठा हॉटेल व्यवसायीक आहे. त्यास सदर धंदयापासुन दररोज १० ते १५ हजार रुपये मिळते. तसेच सामनेवाला नं.१ याचा केटर्स (लग्ना मध्ये मुली मुलांना वाढपे ) पुरविण्याचा काम करतो त्यापासुन दरवर्षी सामनेवाला यास १ ते २ लाख रुपये उत्पन्न मिळतो. तसेच सामनेवाला नं.१ या मौजे खंडाळा ता.श्रीरामपुर येथे ५ रुमचा बंगला आहे. तसेच सामनेवाला यास मौजे संजीवणीनगर कोपरगांव ता.कोपरगांव जि.अ.नगर येथे मोठा बंगला असून सदरचा बंगला हा भाडे तत्वावर दिलेला आहे व त्यापासुन दरमहा १० हजार रुपये उत्पन्न मिळतो. सामनेवाला वर कोणीही अवलंबुन नाही. सामनेवाला नं.१ हा सधन इसम आहे. सामनेवाला नं.१ याने अर्जदारांचा विनाकारण त्याग केलेला आहे. व अर्जदार नं.१ व २ यांच्या अन्न,वस्त्राची, दवापाण्याची कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली नाही. तशी सोय ही केलेली नाही त्यामुळे अर्जदार नं. १ व २ यांना सदरचा अर्ज सामनेवाले विरुध्द दाखल करणे भाग पडले आहे.म्हणून सदरचा अर्ज अर्जदारास सामनेवाले यांचे विरुध्द मे.कोटात **कौटूबिक हिसांचार कायदा २००५ चे कलम अन्वये दाखल करणे भाग पडले आहे.**

११. **अर्जास कारण :-** दि.२२/०३/२०२३ रोजी सामनेवाला हे अर्जदार हिचे आई वडिलांचे घरी आले व अर्जदार व तिचे आई वडिलांना सांगितले की, आमच्या पैशाचे काय झाले, तुम्ही लवकर पैसे दया नाहीतर आम्ही तुमच्या मुलीला नांदविणार नाही, कारण तुम्ही लग्ना मध्ये आम्हाला कमी हुंडा दिला होता त्यावेळी अर्जदार व तिचे आई वडिलांनी त्यास नकार दिला असता सामनेवाला व त्याचे आई व बहिण यांनी अर्जदार हिस पैशाचे कारणावरुन व मुलीच्या कारणावरुन मारहाण केली व निघुन गेले. तेव्हा अर्जास कारण घडले व नित्य दिनी घडत आहे.

१२. **कोर्ट अधिकार :- अर्जदार** ही या मे. कोर्टाचे स्थळ सिमेतील मौजे नेवासा येथे राहत असल्याने सदरचा अर्ज चालविण्याचा या मे. कोर्टास पुर्ण अधिकार आहे.

१३. **कोर्ट फी स्टॅम्प :-** अर्जदार ही महिला आहे. अर्जातील वाद हा कौटुंबीक कलह स्वरुपाचा आहे. यासाठी अर्जदारास स्टॅम्प फी एक्झम्प केलेली आहे. म्हणून स्टॅम्प लावलेला नाही.

**१४. अर्जदाराची विनंती :-** वरील कथनास व हकिगतीस अनुसरुन अर्जदाराची विनंती की,

अ) अर्जदाराचे कौटुंबीक छळाचे घटनेबाबतची दखल घेवून या प्रकरणी योग्य ते आदेश पारीत करावेत.

ब) अर्जदारास सा.वाले यांनी कोणत्याही प्रकारे शिवीगाळ मारहाण तसेच वैयक्तीक जिवण जगण्यास त्रास दायक असे कोणतेही कृत्य करु नये. तसेच सामनेवाले यांनी अर्जदारास वैयक्तीक अथवा इतर भाडेकरु नोकर,चाकर,एंजट यांचे मार्फत तोंडी लेखी दुरध्वनी द्वारे अर्जदारास जिवे मारण्याची धमकी देवू नये.

क) तसेच सामनेवाले यांनी अर्जदाराचे लग्नातील सर्व चिजवस्तु सोन्याचे दागदागिणे त्यामध्ये व संसार उपयोगी साहित्य कपाट,सोफा,पलंग फ्रिज,टिव्ही.गॅस व टाकी व इतर संसार उपयोगी भांडी कुंडी संसार उपयोगी साहित्याची विल्हेवाट लावू नये. सदरचे संपूर्ण वस्तु अर्जदाराचे ताब्यात देण्याचा आदेश व्हावा.

ड) अर्जदाराचे आई व वडिलांनी अर्जदाराचे लग्ना मध्ये सामनेवाले यांना दिलेला श्रीधन म्हणून रक्कम रुपये १,००,००० रुपये देण्याचा आदेश सामनेवाला यांना व्हावा.

उ) अर्जदार हिच्या दैनदिन उपजिवेकेसाठी सामनेवाले यांचे कडून तिस व तिच्या मुलीस प्रत्येकी दरमहा १० हजार देण्याबाबत आदेश व्हावा.

ऊ) अर्जदार हिस तिच्या उदनिर्वाहसाठी तसेच नुकसान खर्च व वैद्यकिय खर्च म्हणून रक्कम रुपये १० लाख देण्याचा आदेश व्हावा.

य) अर्जदाराची सामनेवाले यांनी केलेली विनाकारण बदनामी व आयुष्याचे नुकसान तसेच उमेदीचे सर्व मार्ग व हक्क सामनेवाला यांनी बंद केलेले आहे त्यामुळे अर्जदाराला नुकसान भरपाई म्हणून सामनेवाले कडून रक्कम रुपये ७ लाख देण्याचा आदेश व्हावा.

द) सामनेवाला यांचे खंडाळा ता.श्रीरामपुर येथे ५ रुमचे बंगला असून त्यापैकी दोन खोल्या मध्ये अर्जदार हिस देण्याचा हुकूम व्हावा व सामनेवाले यांनी त्याठिकाणी राहण्यास हरकत अडथळे करु नये. तसेच सामनेवाला यास मौजे संजीवणीनगर कोपरगांव ता.कोपरगांव येथे बंगला असून त्या बंगल्या मध्ये २ खोल्या अर्जदार हिस राहण्यास

देण्यात यावे. तसे न केल्यास सामनेवाला यांनी अर्जदार यांना दरमहा घरभाडे म्हणून रक्कम रुपये १०,०००/- देण्याचा बाबत आदेश व्हावा.

ण) तसेच सामनेवाला यांने मुलीचे खर्चासाठी व अर्जदार हिचे उपजिवीकेसाठी प्रत्येकी रक्कम रुपये १००००/- देण्याचा आदेश व्हावा.

ल) या अर्जाचा संपूर्ण खर्च अर्जदारास सा.वालेकडून देववावा.

व) इतर योग्य ते न्यायाचे दादी देववाव्यात.

श) माहिती अभावी सदर अर्जामध्ये काही राहून गेले असल्यास सदरची माहिती घेवून अर्जा मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी असावी ही विनंती.

नेवासा

दिनांक :- ५ /०४/२०२३

अर्जदार नं.१ स्व:साठी व
अर्जदार नं. २ यांची
अपाक जनक आई

पक्षकाराने दिलेल्या माहिती व वरुन
व सांगितल्या वरुन सदर अर्जाचा मसुदा तयार
करुन दाखल केला असे.

अर्जदार तर्फे ॲडव्होकेट